वाचा:- १. महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७.

२.शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग दि.१६ जानेवारी २००३

३.महाराष्ट्र शासन व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई -३२ कडील शासन निर्णय क्रमांक एपीटी १००१/प्र.क्र.९६०/आस्था-८ दि. २७/६/२००३

४.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुबई -३२ कडील शासन निर्णय क्र.प्रानिमं -२००७/प्र.क्र. ४६/०७/१३-अ दि.१९/१०/२००७

५.शासन पत्र ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रं.एपीटी-२००७/प्र.क्र.२६/आस्था-८ दि.१४/१२/२०१०

६.ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णयक्रं.एपीटी-२००७/प्र.क्र.२६/आस्था-८ मंत्रालय मुंबई दि.२९/०९/२०११

७.वित्त विभाग शा.नि.क्रं.असक-१०१०/प्र.क्रं.१/२०१० वित्तीय सुधारणा-१ दि.५ जुन २०१० व ग्रामविकास व जलसंधारण विभाग पत्रक्रं.एपीटी-२०१२/प्र.क्रं.१४३/आस्था-८ दि. ७ एप्रिल २०१२

८.ग्रामविकास विभाग मुंबई म.शासन नि.क्र.डिएसआर-२०१९/प्रक्र-१६/आस्था-५/दि ०६/०३/२०१९

९.मा.सहाय्यक आयुक्त (मावक) नाशिक यांचेकडील बिंदु नोंदवही तपासणी दि.२९/०३/२०२२.

१०.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शानि.क्र.प्रनिम-१२२२/प्र.क्र.५४/का/१३-अ दि.४ मे २०२२

११.वित्त विभाग,महाराष्ट्र शासन निर्णय क्र वेपुर ११२१/प्रक्र.०४/सेवा-९/दि १३/०२/२०२३

१२.जळगांव विविध संवर्गाची पद भरती जाहिरात क्र ०१/२०२३

१३.आय.बी.पी.एस. कडून प्राप्त निकाल व प्रसिध्द तात्पुरती गुणवत्ता निवड यादी व प्रतिक्षाधीन यादी

१४.जि.प.जळगांव सरळसेवा पदभरती २०२३ कागदपत्र पडताळणी.

१५.अंतिम निवड यादी व जिल्हा निवड समिती इतिवृत्त.

---

**<u>नेमणुक आदेश</u>**

जाक्र/आरोग्य/आस्था-८/आरआर/ ८९/२०२४.
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, जळगाव.
दिनांक :-२३/०८/२०२४.

उपरोक्त वाचा मधील नमुद शासन संदर्भ,नियम,परिपत्रक,जिल्हा निवड समिती इतिवृत्त,प्रसिध्द जाहिरात अटी शर्ती त्यात नमुद नियम,आयबीपीएस कडील प्राप्त गुणवत्ता यादी व महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हासेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ नुसार मला असलेल्या अधिकाराचा वापर करुन मी,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव खालील नमुद उमेदवार यांना तांत्रिक जिल्हा सेवा (वर्ग-३)श्रेणी-३ मधील औषध निर्माण अधिकारी या पदावर समय वेतन_श्रेणी मॅट्रीक्स (एस-१०)रु.**२९२००-९२३००** या वेतन संरचनेत खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीवर तात्पुरती नेमणुक करीत असुन त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयात रिक्त पदी पदस्थापना करीत आहे.सदर नेमणुक ही पुर्णतःतात्पुरती व अस्थायी स्वरुपाची आहे.

| अ.क्र | नेमणुक झालेल्या उमेदवाराचे नाव व पत्ता | जातीचा प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदस्थापीत केलेले पद व कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.विजय शालीकराम सपकाळे,<br>प्लॉट नं.४५, रामनगर टाकळी प्र.चा.<br>कस्तुरी निवास पो.ओझर ता.चाळीसगाव<br>जि.जळगाव पिन को- ४२४११९ | इ.मा.व. | खुला | <u>औषध निर्माण अधिकारी</u><br>प्रा.आ.केंद्र लोहटार ता.पाचोरा |
| २ | श्री.प्रमोद पानचंद पाटील<br>प्लॉट नं.६, रेणुका पार्क, निमखेडी शिवार,<br>चंदुआण्णा नगर जवळ, खोटे नगर<br>ता.जि.जळगाव<br>पिन को- ४२५००१ | इ.मा.व. | खुला | <u>औषध निर्माण अधिकारी</u><br>प्रा.आ.केंद्र कानळदा ता.जळगाव |
| ३ | श्री.अजिक्य भागवतराव पळसे<br>मुकुंद निवास, गणपती मंदिरामागे, दत्त<br>नगर, ता.निलंगा जि.लातुर<br>पिन को- ४१३५२१ | अ.जा. | अ.जा. | <u>औषध निर्माण अधिकारी</u><br>प्रा.आ.केंद्र तरवाडे<br>ता.चाळीसगाव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | श्री.सुयश संजय बोरसे<br>प्लॉट नं.२, सुसंगती, सर्वोदय कॉलणी ,शिव कॉलणीच्या मागे ता.चोपडा<br>जि.जळगाव पिन को- ४२५१०७ | इ.मा.व. | इ.मा.व. | औषध निर्माण अधिकारी<br>प्रा.आ.केंद्र गोरगावले ता.चोपडा |
| ५ | श्री.प्रदिप व्यकटराव मुंढे<br>मु.पो.मुळी ता.गंगाखेड जि.परभणी, पिन को- ४३१५१४ | अ.जा. | अ.जा. | औषध निर्माण अधिकारी<br>प्रा.आ.केंद्र दहीवद<br>ता.चाळीसगाव |
| ६ | श्रीमती.वंदना अनिल माळी<br>पंकज नगर, यावल रोड, ता.चोपडा<br>जि.जळगाव पिन को- ४२५१०७ | इ.मा.व. | खुला | औषध निर्माण अधिकारी<br>प्रा.आ.केंद्र चहार्डी ता.चोपडा |
| ७ | श्रीमती.अश्विनी सुनिल जैन<br>मु.पो.कु-हा पानाचे ता.भुसावळ<br>जि.जळगाव<br>पिन को- ४२५३११ | इ.मा.व. | इ.मा.व. | औषध निर्माण अधिकारी<br>प्रा.आ.केंद्र वराडसिंम ता.भुसावळ |
| ८ | श्री.शितल ज्ञानदेव घुले<br>लोटन बाबुराव निवास सोनाई निवास, गट नं.६०, प्लॉट नं.११८, सिध्दी गणेश मंदीराजवळ, शिव कॉलनी ता.<br>जि.जळगाव पिन को- ४२५००१ | अ.जा. | अ.जा. | औषध निर्माण अधिकारी<br>प्रा.आ.केंद्र भादली<br>ता.जि.जळगाव |
| ९ | श्री.विकास सुनिल धुमाळ<br>पाटील वर्कशॉप जवळ, नारायण वाडी, ता.चाळीसगाव जि.जळगाव<br>पिन को- ४२४१०१ | आ.दु.घ. | आ.दु.घ. | औषध निर्माण अधिकारी<br>प्रा.आ.केंद्र पिंपरखेड ता.भडगाव |
| १० | श्री.पिंन्टु धर्मदास तडवी<br>मु.खारगाव पो.रायखेड ता.शहादा<br>जि.नंदुरबार<br>पिन को- ४२५४०९ | अ.ज. | अ.ज. | औषध निर्माण अधिकारी<br>प्रा.आ.केंद्र किनगाव ता.यावल |

**सदर नेमणुक ही खालील अटी व शर्तीवर करण्यात येत आहे.**

१) सदर नेमणुक ही पुर्णतः तात्पुरती व अस्थायी स्वरुपाची असुन सदर उमेदवारांना नोटीसी शिवाय कोणतेही कारण न दाखवता केव्हांही जिल्हा परिषद जळगांव चे सेवेतुन कमी करणेत येईल असे आहे.

२) सदर पद शासनाने मंजुर केलेल्या आकृती बंधानुसार असुन सदर पदाचे वेतन व भत्याचा खर्च हा शासकिय मंजुर अनुदानातुन करणेत यावा.

३) सदर उमेदवारांनी सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आत नियुक्तीच्या कार्यालयात हजर होणे आवश्यक आहे दिलेल्या मुदतीत हजर झाले नाहीत,तर आपली सदर नियुक्ती रद्द करणेत येईल.

४) सदर उमेदवारास सदर नेमणुकीच्या पदाचा राजीनामा दयावयाचा असेल तर त्यांनी नियुक्ती प्राधिकरणा कडेस एक महिन्याची आगावु नोटीस दयावी अथवा एक महिन्याचा पगार ऐवजी जि.प.जळगांव चे जिल्हा निधीत चलनाव्दारे जमा करुन जमा चलनाची प्रत सादर केल्यावरच राजीनामा मंजुर केला जाईल,अन्यथा नाही.

५) उपरोक्त उमेदवार यांचे बाबतीत कुठलीही आक्षेप प्राप्त झाल्यास भविष्यात सबंधित प्रमाणपत्रे अवैध ठरलेल्या उमेदवारांची नियुक्ती रद्द करणेत येईल.उमेदवारांचे जातीचे प्रमाणपत्र/वैधता प्रमाणपत्र(मागासवीय असलेस व राखीव जागेवर निवड झालेली असलेस) व सादर केलेली इतर कागदपत्र अवैध/चुकिचे आढळल्यास त्यांना जिल्हा परिषद सेवेतुन कमी करणेत येवुन त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करणेत येईल.

६) सदर नियुक्ती मिळणेपुर्वी उमेदवार शासकिय/निमशासकिय सेवेस असल्यास त्या पदांचा राजीनामा देणे आवश्यक आहे.तसे मंजुरीचे पत्र हजर होतांना सादर करावे.तसेच अश्या उमेदवारांनी सदर पदासाठी अर्ज करतांना सक्षम

प्राधिकारी यांची मान्यता घेतली असल्यास ती प्रत व कार्यमुक्तता प्रत हजर होतांना सादर करावी व शासन नियमानुसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन मुदतीत हजर व्हावे व तसा अहवाल सादर करावा.

७) वरील उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र / वैधता प्रमाणपत्र, (मागासवर्गीय असलेस व राखीव जागेवर निवड झालेली असलेस)व सादर केलेले इतर कागदपत्र अवैध/चूकीचे आढळल्यास त्यांना जिल्हा परिषद सेवेतुन कमी करणेत येवून त्याचे विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. मागासवर्गीय उमेदवारानी जात वैधता प्रमाणपत्राची मुळ प्रत नेमणुकीच्या ठिकाणी हजर होतांना सादर करावी.

८) निवड झालेल्या उमेदवारानी मा. पोलीस अधिक्षक यांचेकडील पुर्व चारित्र्य व वर्तणुक पडताळणी प्रमाणपत्र एक महिन्याचे आत प्राप्त करुन घेणेचे आहे सदर पडताळणीत आक्षेपार्ह बाबी आढळुन आल्यास सदर उमेदवारांची नेमणुक रद्द करुन त्याची सेवा संपुष्टात येईल त्याबाबत कार्यालय प्रमुख यांनी वेळीच पत्रव्यवहार प्रक्रिया पुर्ण करावी.

९) नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्याकरिता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा भत्ता दिला जाणार नाही.

१०) संबंधीत कार्यालय प्रमुखांनी सदर उमेदवारांना हजर करुन घेतांना त्यांची जन्मतारिख, शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र,जात वैधता प्रमाणपत्र(मागासवर्गीय असलेस) इ.माहिती दर्शविणारी सर्व मुळ कागदपत्रे तपासणी करुन घ्यावीत.

११) शासन निर्णय वित्त विभाग क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१/१०/२००५ नुसार सदर उमेदवारांना परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन अंशराशीकरण नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी सर्वसाधारण योजना शासनाचे प्रचलित धोरणानुसार त्यांना लागू राहणार नाही.वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४ दि.३१ मार्च २०२३ नुसार उमेदवाराला विकल्प सादर करावयाचा आहे.

१२) सदर उमेदवारांनी नेमणुकीचे जागी हजर झाल्यावर एक महिन्याचे आत म. जिल्हा शल्य चिकित्सक, जळगांव यांचेकडुन वैद्यकिय तपासणी करुन घेवुन जिल्हा परिषद सेवेतील नेमणूकीच्या पदावर सेवेसाठी शारिरीक दृष्टया पात्र असलेबाबतचा वैद्यकिय दाखला सादर करणे आवश्यक आहे.त्याबाबत संबंधीत कार्यालय प्रमुखांनी योग्य ती कार्यवाही करावी.

१३) संबंधीत कार्यालय प्रमुख यांनी त्यांचेकडे नेमणुक झालेल्या उमेदवारास हजर करुन घेतल्या नंतर त्यांचेकडील सर्व मुळ प्रमाणपत्र तपासुन कोणत्याही प्रकारची अडचण किंवा त्रुटी राहणार नाही याची दक्षता घ्यावी.उदा.- जन्मतारीख,जातीचादाखला, मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत जातीचे वैधता प्रमाणपत्र, वचनपत्र (नियमानुसार लागू असतील ते) इ.तपासुन वेतन अदा करावे व त्याबाबतचा अहवाल सादर करावा.

१४) उमेदवारांची नेमणुक एक वर्षाचे शिकावु कालावधीसाठी करणेत येत आहे. तथापी सदर कालावधीत त्यांचे कामकाज समाधान कारक नसल्यास कालावधी पुढे वाढविण्यात येईल.

१५) मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत त्यांना जातीच्या प्रमाणपत्राचे वैधतेच्या अधिन राहुन नियुक्ती देण्यात येत आहे. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बी.सी.सी.२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२/१२/२०११ नुसार **सदर उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र ६ महिन्याच्या आत सादर** करणे आवश्यक आहे. जातीचे प्रमाणपत्राची तपासणी करुन घेणे व त्यासाठी सर्व कागदपत्राची पुर्तता करुन देण्याची जबाबदारी सर्वस्वी संबंधित कर्मचाऱ्यांची राहील पडताळणी अंती जातीचे प्रमाणपत्र अवैध असल्याचे आढळुन आले अथवा जात वैधता प्रमाणपत्र मुदतीत सादर न केल्यास संबधित कर्मचाऱ्यांची सदर पदावरील नेमणुक रद्द करुन त्यांची सेवा संपुष्टात आणली जाईल याची नोंद घ्यावी. याबाबत प्रतिज्ञापत्र रु १००/- चे स्टॅम्प पेपर हजर होतेवेळी कार्यालय प्रमुखांकडे करुन द्यावयाचे आहे.सदर उमेदवारांनी हजर झाले नंतर तीन महिन्याचे आत महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम १७ चे तरतुदीनुसार विहीत नमुन्यातील आवश्यक आहे.सदर विवरणपत्र संबधीताच्या मुळ सेवा पुस्तकांत डकविण्यात यावे.

१६) वरील उमेदवाराला वेळोवेळी निर्धारीत शासन नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधणकारक राहिल, सदर उमेदवाराला महाराष्ट्र जिल्हा परीषदा (जिल्हा सेवा) सेवा प्रवेशोत्तर परीक्षा नियम १९८५ नियम ४ मधील तरतुदीनुसार सेवा प्रवेशोत्तर परीक्षा व शासन निर्णय / इतर प्रशिक्षण विभागीय परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण/पुर्ण करणे बंधणकारक राहील.

१७) शासनाने विहीत केलेली संगणक पात्रता परीक्षा पास केलेली नसलेस दोन वर्षाचे आत उत्तीर्ण करणे बंधणकारक राहील त्यांनी विहीत संगणक पात्रता धारण केली असल्यास मुळ प्रमाणपत्र हजर होतांना संबधीत कार्यालय प्रमुखांकडे सादर करावे व तशी नोंद सेवा पुस्तकात घेणेत यावी.

१८) शासनाचे निर्धारीत आकृती बंधानुसार व शासनाचे अंतीम आढाव्यानुसार सदरचे पद कमी झाल्यास नेमणुक दिलेले उमेदवार नियमानुसार सेवेतुन कमी करण्यास अथवा अन्य त्या पदावर समायोजन करण्यास पात्र राहतील

१९) लहान कुटुबांचे प्रमाणपत्र, इतर वचनपत्र शासन निर्णयानुसार प्रमाणीत करुन देणे बंधणकारक राहील सदरचे प्रमाणपत्र विहीत नमुन्यात घेवुन मुळ सेवा पुस्तकात नोंदविण्यात यावे.

२०) संबंधीत उमेदवारांनी हजर होतांना खालील नमुन्यात कार्यालय प्रमुखाकडे हमीपत्र भरुन देणे आवश्यक आहे. सदरचे हमीपत्र संबंधीताचे मुळ सेवापुस्तकात चिटकविण्यात यावे.

## हमीपत्र

मी.......................राहणार.............हमीपत्र लिहुन देतो की,माझी जळगांव जिल्हा परिषदेकडे औषध निर्माण अधिकारी (आरोग्य)जिल्हा तांत्रीक सेवा वर्ग-३ या पदासाठी नेमणुक झालेली आहे. सदर नेमणुक ही पुर्णतः तात्पुरती व अस्थायी स्वरुपाची असुन माझी सेवा मला पुर्व नोटिस न देता अथवा त्यासाठी कोणतेही कारण न दाखविता कोणत्याही वेळी समाप्त करण्यात येईल याची मला जाणीव असुन त्या तत्त्वावर मी नेमणुक स्विकारीत आहे. सदर पदावर किमान ३ वर्ष सेवा पुर्ण केल्या शिवाय अन्य जिल्हा परिषदामध्ये बदलीने नेमणुक बाबत मला पुर्ण जाणीव आहे. सदर आदेशातील सर्व अटी व शर्ती मला मान्य असुन, सर्व अटीशी मी सहमत व बांधील आहे.

**समक्ष**
**कार्यालय प्रमुखाची सही ,हुद्दा व शिक्का**

**उमेदवाराची स्वाक्षरी**

सदरचे आदेशाची नोंद सर्व संबंधीतांचे मुळ सेवा पुस्तकांत घेण्यात येवुन सदर आदेशांची शासन नियमांनुसार तातडीने काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सदर आदेशा नुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल तातडीने या कार्यालयास सादर करण्यात यावा.

23/7/24

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद जळगांव

**अंकित (भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद जळगांव**

**प्रत.- माहितीस्तव**

१. म.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती जळगांव यांना सविनय सादर
२. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगाव.
३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (साप्रवि) जि.प.जळगांव
४. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.जळगांव

**प्रत.- कार्यवाही साठी**

१. संबंधीतांस पोष्टाव्दारे
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, -------------------ता.------------------जि.जळगाव
३. वैद्यकीय अधिकरी प्रा.आ.केंद्र ---------------------------ता.---------------------जि.जळगाव

२/- उपरोक्त आदेशात नमूद अटी नुसार पूर्तता योग्य त्या हमीपत्र व चरित्र्य पडताळणी व कागदपत्रांची पूर्तता करुन संबंधीतांना हजर करुन घेऊन कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

23/7/24

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद जळगांव

**अंकित (भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद जळगांव**